Annexure XII(9),(Vide Article 12.03.02)

शीघ्रटपालाने

प्र. मु. व. सं. म. राज्य
नागपूर-४४० ००६.
आवक क्रमांक 3886
स्वाक्षरी

क्रमांक : टिआरएस-१०९५/प्र.क्र.११२/फ-६
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६/१२/२००५.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- वन कर्मचा-यांना शस्त्र वापरण्याबाबत आचारसंहिता व नियमावली/अंमलबजावणीबाबत.

संदर्भ : - १) शासनपत्र समक्रमांक दिनांक ८/३/२००२.
२) आपले पत्र क्र.कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२०२ (०१-०२)/भाग-१/६७२/०४-०५, दि. १६/१०/२००४.

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भित पत्र क्रमांक १ व २ कृपया पहावेत.

२. उपरोक्त विषयाबाबतच्या आपल्या संदर्भाधीन पत्र क्रमांक २ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, वनकर्मचा-यांना शस्त्र वापरण्याबाबतच्या आचारसंहिता व नियमावलीस मंत्रीमंडळ प्रस्तावातील ११ (ड) खाली मंत्रीमंडळाने दिनांक २४/८/२००० रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संदर्भित शासनपत्र समक्रमांक दिनांक ८/३/२००२ सोबत आपणांस आचारसंहिता व नियमावली (मराठी व इंग्रजी) पाठविण्यात आली असून सदरहू आचारसंहिता व नियमावलीच्या प्रती सर्व संबंधितांना पाठवाव्यात अशी आपणांस विनंती करण्यात आली आहे.

३. आपल्या संदर्भाधीन दिनांक १६/१०/२००४ च्या पत्रान्वये नमूद केलेल्या प्रस्तावित उपाययोजना शस्त्र वापरण्याबाबतच्या आचारसंहिता व नियमावलीतील मुद्दा क्रमांक १५ मध्ये समावेश करण्यास शासनाची अनुमती प्रदान करण्यात यावी अशी आपण शासनास विनंती केली आहे. त्यास अनुलक्षून खालीलप्रमाणे नमूद केलेल्या उपाययोजना आचारसंहिता व नियमावलीतील मुद्दा क्रमांक १५ मध्ये समाविष्ट करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

* एका वनकर्मचा-याला नेमून दिलेले शस्त्र कोणत्याही परिस्थितीत दुस-या कर्मचा-याने वापरु नये.
* गुन्हेगार, अतिरेकी किंवा नक्षलवादी प्राबल्य वनक्षेत्रात एकटया-दुकटया वनकर्मचा-याने शस्त्रासह जाऊ नये. अशा क्षेत्रात फिरती करतांना वनकर्मचा-यांनी ८-१० कर्मचा-यांच्या समुहासह फिरती करावी.
* शस्त्रधारी वनकर्मचा-यांने त्यांच्या जवळील पिस्तुल अथवा रायफल साखळीच्या सहाय्याने स्वत:च्या कंबरेला बांधून फिरती करावी.
* शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षण न घेतलेल्या वनकर्मचा-यांच्या ताब्यात शस्त्रे कदापिही देऊ नयेत.

* वनकर्मचारी जेव्हा जेव्हा शस्त्रासह राखीव/संरक्षित वनक्षेत्रात फिरती करतील त्यावेळी शक्यतोवर त्याबाबतची पूर्व कल्पना संबंधित उपवनसंरक्षक/सहाय्यक वनसंरक्षक यांना देतील. अशा फिरतीच्या पूर्वी आणि नंतर शस्त्र/दारुगोळ्याचा हिशोब संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी/सहाय्यक वनसंरक्षक हे स्वत: तपासून शस्त्र/दारुगोळ्याच्या संख्येबाबत खात्री करतील.
* रायफलचा पुरवठा केवळ फिरत्या पथकातील कर्मचा-यांनाच करावयाचा असल्याने अशा कर्मचा-यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक यांच्या नियंत्रणाखालीच फिरती करावी.
* नक्षलग्रस्त राखीव/संरक्षित वनक्षेत्रात शस्त्रासह समुहाने फिरती करण्यापूर्वी संबंधित पोलिस स्टेशनला गोपनीयरित्या आगाऊ सूचना द्यावी.
* वनकर्मचा-यांना पुरवठा करण्यात आलेल्या शस्त्राचे पंजीबध्द क्रमांक संबंधित पोलिस स्टेशनला माहितीकरिता कळविण्यात यावे.

वर नमूद उपाययोजनांचा आचारसंहिता व नियमावलीतील मुद्दा क्रमांक १५ मध्ये समाविष्ट करुन, प्रती सर्व संबंधितांना पाठवाव्यात, ही विनंती.

(आ.वि.आप्टेकर)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग